**Friday, August 06, 2010**

**Anti-smoking medicines affects on life**

Publication: Punyanagri, Edition: Pune, Journalist: Bureau, Page No: 11, Location: Middle-Right, Width(cms): 12, Height(cms): 8, Size(sq.cms): 96

html>

# धूम्रपान सोडणारी औषधे करतात आत्महत्येस प्रवृत्त?



मेलबर्न - प्रयत्न करूनही धूम्रपान सोडण्यात अपयशी ठरणारे लोक या घाणेरड्या सवयीपासून सुटका करून घेण्यासाठी अखेर औषधांचा आधार घेतात. या औषधांचा काही प्रमाणात लाभ होत असेलही, पण त्यामुळे भलतीच समस्या उद्‌भवू शकते. चॅपिक्स नावाच्या या औषधामुळे धूम्रपानास रामराम करण्याच्या विचारात असलेली व्यक्ती जगाचाही कायमचा निरोप घेऊ शकते. कारण ही औषधे व्यक्तीला आत्महत्येससुद्धा प्रवृत्त करू शकतात. एकट्या ऑस्ट्रेलियात ही औषधे खाऊन आतापर्यंत १५ लोकांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे. आत्महत्येच्या विचारापर्यंत पोहोचलेल्या अन्य शेकडो लोकांना सामुदेशनाने त्यातून बाहेर काढण्यात आले. विशेष म्हणजे, २००८ मध्ये तयार झालेल्या या औषधावर बंदी घालावी अशी जोरदार मागणी होत असूनही सरकारने त्यासंबंधी अजून कोणतीही पावले उचलली नाहीत. खरेतर ही औषधे धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीची ती इच्छा मारून टाकतात, पण त्यांच्या सेवनामुळे नैराश्य, तणाव, चिडचिडसारखी लक्षणेही डोके वर काढू लागतात. या लक्षणांमुळे व्यक्ती आत्महत्या करण्याचा विचार करू लागतो, असे शास्त्रज्ञांनी सांगितले.